श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द.
तिरडे, ता. अकोले यांना पदावरून
तात्पुरते दुर करणेबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-४/१६७/ ११८ /२०२६
अहिल्यानगर दिनांक - ११ /०३/२०२६

वाचा - १. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६
२. महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०२५/प्र.क्र .१०/E Office No. १३३९०२०/कार्यासन-३, मुंबई,दि. ९ ऑक्टोबर २०२५
३. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अहिल्यानगर यांचेकडील वैदयकिय तपासणी अहवाल पत्र क्र. जि. रु. अ./ दिव्यांग/प्र/ पुनश्च/तपासणी/पडताळणी/७५१-५५/२०२६ दि. १९/०१/२०२६
४. इकडील कारणे दाखवा नोटिस जा. क्र. साप्रवि-१/आस्था-४/१६७/६२/२०२६ दि. १०/०२/२०२६
५. गट विकास अधिकारी, पं. स. अकोले यांचेकडील पत्र जा. क्र. वशि/आस्था-१/५१२/२०२६ दि. २४/०२/२०२६

उपरोक्त संदर्भिय क्र. २ नुसार जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी हे बनावट/संशयित अथवा लाक्षणिक दिव्यांगत्व (Benchmark Disability) नसलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी अथवा अन्य शासकीय लाभ घेत असल्याबाबत शासनास अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर तक्रारी मध्ये दिव्यांगत्वाचे वैश्विक ओळखपत्र(UDID CARD) बाबत साशंकता व्यक्त केलेली आहे. त्यामुळे सदर दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राची (UDID CARD) पडताळणी करणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९१ मध्ये स्पष्ट केलेल्या तरतुदीनुसार **"लाक्षणिय दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तीस कोणताही लाभ सवलत जर अन्य पात्र नसलेल्या व्यक्तीने प्राप्त करुन घेतला किंवा घेण्याचा प्रयत्न केला तर अभिप्रेत असलेला संबंधित व्यक्तीस दोन वर्षापर्यत कारावास किंवा रुपये एक लक्ष पर्यंत दंडासाठी किंवा या दोन्ही शिक्षासाठी पात्र ठरतो. त्याच प्रमाणे त्यांनी घेतलेल्या लाभाची वसुली करण्यात यावी. या तरतुदीनुसार पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी"** असे निर्देश आहेत. यास्तव आरक्षणाअंतर्गत लाभ घेतलेल्या सर्व दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांचे दिव्यांगत्व तसेच दिव्यांगत्व प्रमाणपत्र/वैश्विक ओळखपत्र (UDID) इत्यादीची पडताळणी करुन त्यांच्या दिव्यांगत्वाबाबत शहानिशा करण्यासाठी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्र. ३ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय अहिल्यानगर यांचेकडील अहवालानुसार **श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द. तिरडे, ता. अकोले** यांचे दिव्यांगत्व **अस्थिव्यंग २५%** इतके आढळून आलेले आहे. जे कोणत्याही लाभास पात्र नाही. सदर दिव्यांगत्वाच्या आधारावर नियुक्ती/बदली/सेवा जेष्ठता/ वाहन भत्ता/ आयकर सवलत ह्या सवलतीचा लाभ घेतला आहे. त्यामुळे श्री. चोखंडे यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे.

श्री. चोखंडे, परिचर यांनी नियुक्ती/बदली/सेवा जेष्ठता/वाहन भत्ता/ आयकर सवलत ह्या सवलतीचा लाभ घेतलेला असल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर मला महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ चा भाग दोन पदावरुन तात्पुरते दूर करणे नियम ३ (१) (अ) नुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशान्वये **श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द. तिरडे, ता. अकोले** यांना आदेशाच्या दिनांकापासुन जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करीत आहे.

असेही आदेशित करणेत येते की, हा आदेश अमंलात असेल तेवढया कालावधीत **श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द. तिरडे, ता. अकोले** यांचे निलंबन कालावधीचे मुख्यालय ए.बा.वि.से. संगमनेर येथे राहील. निलंबन निर्वाह भत्ता हा निलंबन कालावधीत नेमून दिलेल्या मुख्यालयाच्या ठिकाणी काढण्यात येईल. तसेच त्यांना निम्न स्वाक्षरीत व्यक्तींच्या पुर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फ व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) मधील नियम ६८ (१) (ए) नुसार **श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द. तिरडे, ता. अकोले** हे अर्धवेतनी रजेवर असतांना त्यांना जितके रजा वेतन मिळाले असते त्या रजा वेतना इतकी निर्वाह भत्याची रक्कम आणि त्या व्यतिरिक्त त्यांना अशा रजा वेतनावर आधारलेला महागाई भत्ता एवढी रक्कम ही निलंबन तारखेपासून पुढील आदेश होईपावेतो निर्वाह भत्ता म्हणुन मंजूर करण्यात येत आहे. तसेच नियम ६९ (४) नुसार निलंबन काळात त्यांनी खाजगी नोकरी स्विकारलेली नाही किंवा कोणताही धंदा अथवा व्यापार केला नाही, असे प्रमाणपत्र दरमहा निलंबन कालावधीचे मुख्यालयी प्रस्तुत करणे आवश्यक राहील. अन्यथा निर्वाह भत्ता प्रदान केला जाणार नाही.

सदर आदेशाची नोंद **श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द. तिरडे, ता. अकोले** यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्रं. 202603110400046 असा आहे.

(आनंद भंडारी)

मुख्य कार्यकारी अधिकारी (भाप्रसे)

जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द. तिरडे, ता. अकोले

व्दारा व प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले

प्रत:- १. मा. सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले / संगमनेर

३. बालविकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से. संगमनेर

२/- सोबत आदेशाच्या २ प्रती जोडुन पाठविण्यात येत आहे. त्यापैकी निलंबन आदेशाची मुळप्रत **श्री. प्रभाकर संतु चोखंडे, परिचर, प. वै. द. तिरडे, ता. अकोले** यांना बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सदर आदेशाची नोंद त्यांच्या मुळसेवापुस्तकात घेऊन सेवापुस्तकात नोंद घेतल्याची झेरॉक्स प्रत (साक्षांकित) या कार्यालयास सादर करणेत यावी. त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ नुसार कर्तव्यात अक्षम्य कसुर केल्याबाबत त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करणे कामी दोषारोपाचे परिशिष्ठ १ ते ४ हे पुराव्याच्या कागदपत्रासह हार्ड व सॉफ्ट कॉपी मध्ये तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावे. तसेच दिव्यांग कल्याण विभागाकडील शासन निर्णय दि. ०९/१०/२०२५ मधील (i) मध्ये नमुद केलेनुसार त्यांनी घेतलेल्या लाभांची वसुली तात्काळ करुन अहवाल सादर करावा.

(आनंद भंडारी)

मुख्य कार्यकारी अधिकारी (भाप्रसे)

जिल्हा परिषद अहिल्यानगर